**विरार - डहाणू कॉरिडॉर :**

## सामाजिक प्रभाव मूल्यांकन

## कार्यकारी सारांश

एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (AIIB)(बँक), MUTP-3 प्रकल्पा अंतर्गत पश्चिम रेल्वेवरील 63 कि.मी. च्या **विरार - डहाणू** रेल्वे मार्गाचे चौपद्रीकरणासाठी कर्ज सहाय्य प्रदान करण्यास सहमत आहे. श्रेणी 'अ' प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार पुनर्वसन कृती योजनेसह (RAP) सामाजिक प्रभाव मूल्यांकन (SIA) तयार करण्यात आले आहे. या सामाजिक प्रभाव मूल्यांकन (SIA) मध्ये नोंद केलेल्या सामाजिक परिणामाचा नकारात्मक प्रभाव सौम्य वा कमी करण्यासाठी पुनर्वसाहत कृती योजना (RAP) तयार करण्यात आली आहे. ह्या प्रकल्पासाठी तयार केलेल्या पुनर्वसाहत धोरण रचना (RPF) मधील मार्गदर्शक तत्त्वांचे, पुनर्वसाहत कृती योजना (RAP) पालन करते.

खाजगी जमिनीच्या प्रत्यक्ष खरेदीसाठी प्रारंभिक सूचना प्रकाशित करण्याच्या तारखेला, महाराष्ट्र शासनाच्या निर्णय नुसार क्रमांक संकर्णा-03/2015 दिनांक 12/05/2015 शीर्षकधारकांसाठी अंतिम तारीख मानली जाईल, तर महाराष्ट्र शासन निर्णय चंपा -2017 / प्र.क्र .23 / नवी -26 दिनांक दिनांक 13 जून 2018 नुसार शीर्षकधारक नसलेल्यासाठी, अंतिम तारीख 1 जानेवारी 2018 असेल.

बँकेच्या धोरणानुसार या प्रकल्पाचे अनैच्छिक पुनर्वसाहत प्रभावांमुळे श्रेणी 'अ' मध्ये वर्गीकरण केले गेले आहे तसेच पर्यावरण आणि सामाजिक मानक २ लागू आहे. AIIB च्या पर्यावरण आणि सामाजिक रचनेच्या (ESF) अनुषंगाने, पर्यावरण आणि सामाजिक मानक (ESS) 1: पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन आणि व्यवस्थापन, आणि ESS 2: अनैच्छिक पुनर्वसाहत लागू होईल.

सुरक्षितेच्या सतर्कशी तडजोड न करता, बांधकामाची रूपरेषा सुधारल्यामुळे आणि मार्गाचा होणारा परिणाम कमी केल्याने 97 खाजगी संरचना आणि 11 समुदाय संरचना वाचवले आहेत. या प्रकल्पासाठी एकूण जमीन 47.6225 हेक्टर भू संपादनाची आवश्यक आहे. त्यामध्ये 14.84 हेक्टर सरकारी जमीन आहे आणि 32.78 हेक्टर खाजगी जमिनी आहे.

या प्रकल्पामुळे 278 जमीन-मालक कुटुंबे, 40 सरकारी इमारती, 127 खाजगी निवासी संरचना आणि 4 सरकारी संरचना प्रभावित होत आहेत. कोणतीही सामाजिक संरचना

किंवा कोणतीही व्यावसायिक संरचना प्रभावित होत नाही, तसेच यामध्ये कोणतेही अंनधिकृत अधिवास किंवा अतिक्रमणधारक प्रभावित होत नाहीत. केवळ 11 कमजोर व कमकुवत प्रभावित कुटुंब आहेत, त्यामध्ये अनुसूचित जमाती (7 कुटुंब) आणि अनुसूचित जाती (4 कुटुंब) आहेत. यामधील सर्व प्रभावित अनुसूचित जमातीमधील कुटुंबे मुख्यधाराच्या जीवनशैलीचे अनुसरण करतात त्यामुळे मूळ आदिवासी लोकांमध्ये त्यांचे वर्गीकृत होत नाही.

या प्रकल्पा दरम्यान एकूण 6 सार्वजनिक सल्लामसलत घेण्यात आले, त्यामध्ये 2 महिला सल्लामसलत, आणि एक व्यवसायी व्यक्ती व व्यापारींशी सल्लामसलत झाले आहेत. वरील सल्लामसलतीमद्धे एकूण 80 व्यक्ती उपस्थित होते आणि प्रकल्पाच्या दृष्टीकोणातून सर्वांनी त्यांचे मत आणि सूचना व्यक्त केली. धार्मिक आणि स्थानिक नेत्यांशी सल्लामसलत देखील केले. बहुतेक लोक प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या बाजूने आहेत, परंतु काही लोक प्रकल्पांच्या मुदतीच्या आणि वेळेवर अंमलबजावणीच्या, आणि नुकसान भरपाईच्या दराबद्दल चिंतित होते.

तक्रार निवारण यंत्रणेमध्ये, जमीन अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत (R&R) आणि इतर समस्यांशी संबंधित समस्यांवरील तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समिती (GRC) क्षेत्रीय स्तरावर आणि मुख्यालय स्तरावर समाविष्ट आहे. GRC च्या निर्णयाशी पूर्णपणे संतुष्ट नसल्यास प्रकल्पग्रस्त AIIB कडे जाऊ शकतात तसेच प्रकल्पग्रस्तांना न्यायालयात जाण्याचा पर्याय देखील असेल.

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP-III) साठी, पुनर्वसाहत धोरण रचना (RPF), हे राष्ट्रीय अधिनियम, धोरणे आणि सरकारी आदेशांवर आधारित तसेच पर्यावरण आणि सामाजिक रचना (ESF) च्या आणि दि एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट (AIIB) बँकच्या प्रकल्पग्रस्त लोक यंत्रणा (PPM) च्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आले आहे.

पात्रता मेट्रिक्स (EM) मध्ये सर्व प्रकारचे संभाव्य नुकसान आणि प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या हक्कांसाठी संबंधित स्वरूप आणि पात्रता तयार केले गेले आहे.

या प्रकल्पांसाठी भूसंपादन, खाजगी वाटाघाटीने थेट ख्ररेदी पध्दतीने घेण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे धोरण व महाराष्ट्र शासनाच्या निर्णय दि. १२/०५/२०१५ व ३०/०९/१५ च्या तरतुदीप्रमाणे वाटाघाटी करून थेट खरेदीद्वारे करण्यात येणार आहे. काही कारणास्तव थेट

खरेदीद्वारे भूसंपादन न झालेल्या जमिनीचे संपादन, RFCTLARRA 2013 अंतर्गत करण्यात येईल आणि नुकसान भरपाई अनुसूची 1 आणि अनुसूची 2 नुसार केली जाईल.

थेट खरेदी पद्धतीनुसार, भरपाईमध्ये RFCTLARR अधिनियम 2013 च्या कलम 26 ते 30 नुसार मोजण्यात आलेल्या मुदतीवर 25% अतिरिक्त रक्कम दिली जाईल. या प्रकल्पासाठी पुनर्वसन आणि पुनर्वसाहत अंदाजपत्रकास रक्कम रु. 312.05 कोटी रुपये आणि थेट जमीन खरेदीच्या अंदाजपत्रका रक्कम 248.04 कोटी रुपये एवढी आहे.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (MRVC) ही प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी संस्था असेल, जी प्रकल्प अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) अंमलबजावणीच्या कार्यांत, MRVC द्वारे त्यांना मदत केली जाईल.

RAP अंमलबजावणीचे वेळापत्रक संपूर्ण प्रकल्प अंमलबजावणी कार्यक्रमाशी जोडला जाईल. RAP च्या मंजुरीवर, रक्कम वाटप, भत्ता आणि पुनर्वसन आणि पुनर्वसाहती (R & R) च्या लाभाचे पैसे, मंजूर झालेल्या RAP नुसार दिले जातील. या प्रकल्पाच्या अंतर्गत प्रकल्प बाधित लोकांना पुरेशी माहिती, सल्ला आणि सहाय्य प्रदान केले जाईल जेणेकरुन ते रक्कम प्राप्त झाल्यानंतर व बांधकाम सुरू करण्यापूर्वी त्यांची संपत्ती हलवू किंवा सोडू शकतील. जमीन अधिग्रहण आणि पुनर्वसन अंमलबजावणीचे काम प्रगती पथावर आहे. प्रकल्पाचे निर्माण कार्य अंदाजे ऑक्टोबर 2019 पासून सुरू होईल आणि पूर्ण होण्यास सुमारे 5 वर्षे लागतील.

जमीन अधिग्रहण प्रक्रिया सुरू असताना प्रकल्पातील जमीन अधिग्रहण प्रक्रियेचे मूल्यांकन करण्यासाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन द्वारे एका त्रयस्थ संस्थेची नियुक्ती केली जाईल.

पुनर्वसाहत कृती योजना (RAP) च्या अंमलबजावणीच्या प्रभावावर, मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन (MRVC) द्वारे लक्ष ठेवले जाईल. मुंबई रेल्वे विकास कार्पोरेशन द्वारा पुनर्वसाहत कृती योजनाच्या अंमलबजावणीची स्वतंत्र संस्थेच्या मदतीने अंमलबजावणी दरम्यान व अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर मूल्यांकन करण्यात येईल.

--------------------